


*जगतिक मराठी अकादमी मुंबई व विश्वशांती केंद्र, माईर्स एमआयटी, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'शोध मराठी मनाचा २००७'च्या उद्घाटनप्रसंगी (डावीकडून) मोहन धारिया, रामदास फुटाणे, डॉ.भालचंद्र मुणगेकर, प्रकाश भालेराव, डॉ.श्रीराम लागू आणि प्रा.डॉ.विश्वनाथ कराड.*

## विसाव्या शतकातील महाराष्ट्र वैचारिकदृष्टया आधिक प्रगल्भ : डॉ.मुणगेकर

गेल्या ५० वर्षात साहित्याच्या विश्वातील सगळया मर्यादा गृहित धरून १९व्या शतकातला महाराष्ट्र हा २० व्या शतकापेक्षा वैचारिकदृष्टया आधिक

प्रभावी होता, अशी परवड भावना भारताच्या नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी व्यक्त केली.

जागतिक मराठी अकादमी मुंबई व विश्वशांती केंद्र माईर्स एमआयटी पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'शोध मराठी मनाचा २००७'या संमेलनात ते बोलत होते.

अध्यक्षस्थांनी अमेरिकेतील व्यावसायिक प्रकाश भालेराव होते. यावेळी संमेलनाचे मावळते अध्यक्ष डॉ. श्रीराम लागू, जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे, वनराईचे अध्यक्ष मोहन धारिया आदि उपस्थित होते. डॉ.मुणगेकर म्हणाले, महाराष्ट्राचा इतिहास हा महाराष्ट्राच्या भूगोलाने घडविला आहे. भारतातील अनेक महत्वाच्या घडामोडी आणि व्यक्तीमत्वे महाराष्ट्रात होऊन गेली. २५ ते ३० वर्षापुर्वी आपल्यामध्ये काहीसा न्युनगंड व फुटीरपणा होता. तो आता उरलेला नाही. अल्पसंतुष्ट व खेकडयाची उपमा दिलेल्या मराठी माणसाने ही उपमा पुसून टाकण्याच्या दिशेने वाटचाल केली असल्याने त्यांनी नमुद केले.

महाराष्ट्रातील स्त्रियांनी स्वत:ची साधलेली प्रगती पाहता भारतीय अस्मितेला कुठेही तडा न देता मी मराठी आहे असे म्हणताना मला सार्थ अभिमान वाटतो, असे त्यांनी आर्वजून नमुद केले.

भाषा ही माणसामाणसात प्रेम उत्पन्न करण्यासाठी निर्माण झालेले संवादाचे साधन आहे. यासाठी आपण मराठी भाषा डोळसपणे अंगिकार केला पाहिजे, असे मत संमेलनाचे मावळते अध्यक्ष डॉ. श्रीराम लागू यांनी व्यक्त केले.

प्रा.डॉ.विश्वनाथ कराड यांनी प्रास्ताविक केले तर सुधीर गाडगीळ यांनी सुत्रसंचालन केले.